# जिल्हा परिषद जळगाव
**(सामान्य प्रशासन विभाग)**

Contact No.-(off.) 0257-2224255
Email-dyceogenjalgaon@gmail.com

जा.क्र.साप्रवि/आस्था-६/आरआर/५४५/२०२४ दिनांक :- २३/०७/२०२४

प्रति,

१) औषध निर्माण अधिकारी २) कनिष्ठ सहाय्यक (लिपीक)
३) कनिष्ठ अभियंता ४) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक
या संवर्गातील अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवार
(प्रतिक्षा यादीतील वगळुन)

**विषय:- जिल्हा परिषद, जळगांव अंतर्गत गट - क संवर्गातील सरळसेवा पदभरती नियुक्ती पत्र (आदेश) घेणेकामी उपस्थित राहणे बाबत - दिनांक २५/०७/२०२४**

**संदर्भ :-** दिनांक २२/०७/२०२४ रोजी नियुक्ती बाबत घेण्यात आलेले समुपदेशन

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जिल्हा परिषद जळगांव अंतर्गत विविध विभागाकडील रिक्त असलेली पदे सरळसेवेने पद भरती करणेसाठी देण्यात आलेली जाहिरात, ऑनलाईन परिक्षा, आय.बी.पी.एस.कंपनीकडून प्राप्त निकाल गुणपत्रक व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक/प्रानिभ-१२२२/प्र.क्र.५४/का-१३-अ दिनांक ४ मे २०२२ मधील तरतुदीनुसार अंतिम निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणेत आली. त्यानुसार **कनिष्ठ सहाय्यक, औषध निर्माण अधिकारी, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक**, या संवर्गातील पात्र निवड यादीतील उमेदवार (प्रतिक्षा यादीतील वगळुन) यांना नियुक्ती देणे कामी समुपदेशन घेण्यात आलेले आहे.

सदर संवर्गातील अंतिम निवड यादीतील उमेदवार यांना नियुक्ती पत्र (आदेश) देण्यात येणार असल्याने संबधित अंतिम निवड यादीतील (प्रतिक्षा यादी वगळुन) पात्र उमेदवार यांनी नियुक्ती पत्र स्विकारणेकामी **दिनांक २५/०७/२०२४** रोजी **सकाळी १०-००** वाजता **छत्रपती संभाजी महाराज नाटयगृह, महाबळ,जळगांव** येथे न चुकता उपस्थित रहावे.

**अंकित (भा.प्र.से.)**
**सदस्य,**
**जिल्हा निवड समिती तथा,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव.**

**प्रत :-** कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि.प.जळगांव यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना
**प्रत :-** जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,जळगांव यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना